# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/10/2023 (सोमवार) दुपार

---

## मोबाईल चोरी

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील जामा मस्जिद खापरखेडा येथे दिनांक ३०/०९/२०२३ चे २३/३० वा. ते दिनांक ०१/१०/२०२३ चे ०५/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— अब्दुल अल्ताफ अब्दुल रहीम शेख, वय ३३ वर्ष, रा. नवीन वस्ती मंगळवारी बाजार सदर नागपूर व त्याचा मित्र शेख शरबुद्दीन हाफिजुद्दीन शेख असे खापरखेडा येथे जामा मज्जित मध्ये तबलीकी प्रोग्राम करिता आले होते त्या ठिकाणी फिर्यादीचा मोबाईल विवो कंपनीचा किंमती १४,०००/— रुपये व नगदी ५००/— रुपये व त्याच्या मित्राचा मोबाईल वन प्लस किंमती १७,०००/— रुपये नगदी ८००/— रुपये असा एकूण ३२,३००/— रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार राऊत मो. नं. ८५५४९६७९४० हे करीत आहे.

## अवैध रेती (गौणखनिज) चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## विशेष पथक नागपूर ग्रामीणची कारवाई

मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) यांचे आदेशाने अवैध धंदयाचे समुळ उच्चाटन करणेकरीता एक विशेष पथक तयार करण्यात आले असुन दिनांक ०१/१०/२०२३ चे ०६.०० वा. ०६.३० वा. दरम्यान विशेष पथक हे नरखेड हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार सिंधी गावाजवळील रोड नरखेड येथे यातील **आरोपी नामे— १) टिप्पर क्र. एम. एच— ४०/बि.एल— ०५०२ चा चालक नामे शेषराव गणबा खंडाते वय ३६ वर्ष रा. मेटपांजरा ता. काटोल २) टिप्पर ट्रक क्र. एम. एच.— ४०/बि.जी— ४२४५ चा चालक नामे मयुर हेमराजजी चचाणे वय २४ वर्ष रा. झिल्पा ता. काटोल ३) टिप्पर ट्रक क्र. एम. एच— ४०/सि.एम ८५३९ चा चालक नामे शंकर तुकाराम वरठी वय ३४ वर्ष रा. मोहगाव भदाडे ४) टिप्पर ट्रक क्र. एम. एच—४०/बि.एल— २१२२ चा चालक नामे विजय कृष्णाजी टेकाम वय २४ वर्ष रा. सिर्सावाडी ता. काटोल ५) टिप्पर ट्रक क्र. एम. पी— २८/एच २७७७ चा चालक नामे संजय नथ्थुजी सलाम वय ३७ वर्ष रा. मेटपांजरा ता. काटोल ६) टिप्पर ट्रक क्र. एम. एच.—४०/बि.एल ३१०२ चा चालक नामे किशोर श्रावण खरोले वय २५ वर्ष रा. दावसा ता. नरखेड ७) टिप्पर ट्रक क्र. एम. एच.— ४०/सि.एम. ४२४५ चा चालक नामे महेन्द्र श्यामराव राउत वय ३६ वर्ष रा. झिल्पा ता. काटोल** हे आपले ताब्यातील ७ टिप्पर ट्रक किंमती अंदाजे २५,२००,०००/— रू मध्ये एकुण २८ ब्रास रेती किंमती अंदाजे १९६,०००/— रू. असा एकुण २५,३९६,०००/— रूपयाचा मुद्देमाल शासनाचे मालकीचे रेती व गौणखनिजांची विनापरवाना टिप्पर ट्रक वाहनाद्वारे चोरटी वाहतुक करतांनी मिळुन आल्याने सात टिप्पर चालक यांनी मालकाच्या म्हणण्यावरून रेती वाहतुक करीत आहे असे सांगितले. आरोपीतांच्या ताब्यातून ७ टिप्पर ट्रक किंमती २५,२००,०००/— रू मध्ये एकुण २८ ब्रास रेती किंमती १९६,०००/— रू. असा एकुण २५,३९६,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके पो.स्टे. कुही नेमणुक विशेष पथक नागपुर ग्रामिण यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ३४, १०९ भांदवि. सहकलम ४८(८) म.ज.म.सं. १९६६ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा अरूण भेंडे मो. नं. ९९२३१९३६४२ हे करीत आहे.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके, पोलीस नायक महेश बिसने, पोलीस अंमलदार अनिल करडखेले, विशाल शंभरकर यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**